महाराष्ट्र शासन

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना

राज्य आरोग्य हमी सोसायटी

जीवनदायी भवन, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार गणपत जाधव मार्ग,वरळी, मुंबई ४०० ०१८
दुरध्वनी क्रमांक- ०२२- २४९९९२०३/०४/०५, website www.jeevandayee.gov.in

# जाहिरात

राज्य आरोग्य हमी सोसायटी कार्यालयात वैद्यकीय बाबी हाताळण्यासाठी अनुभवी अधिकाऱ्यांची नामिकासूची तयार करण्यात येत आहे. त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी हे "मुख्य वैद्यकीय सल्लागार" व "वैद्यकीय सल्लागार" या कंत्राटी तत्त्वांवरील पदांसाठी नामिकासूची तयार करण्याकरिता खालीलप्रमाणे अर्हताधारक व अनुभवी तसेच सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागवित आहेत.

**पदनिहाय आवश्यक अर्हता, अनुभव व वयोमर्यादा:**

| No. | Name of the Post | No. of Post | Qualification | Age Less than | Experience | Salary |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Chief Medical Consultant | 01 | a) MBBS & PG in clinical subject in allopathic Medicine and registered with concerned medical council.<br>b) Retired Govt. Officer Will be Preferred.<br>c) Preference will be given to candidates having additional diploma or Degree Qualification. | 65 years. | 20 Years<br>(Equivalent to rank of Director/Jt.Director/Dy.Director/Assistant Director/Civil Surgeon/Medical Superintendent/Medical Officer with more than 20 years of Service Experience.) | For Retired. Govt. officials salary as per General Administration Dept. GR dated 17.12.2016 |
| | | | | | In case of Non Govt. candidate Preference will be given to the candidate with experience more than 3 Yrs. after passing PG.<br>For Non Govt. candidate age should be up to 38 years. | For Non Govt. candidate Gross salary Rs.80,000/- p. m |
| 2 | Medical Consultant | 02 | a) MBBS registered with concerned Medical council<br>b) Retired Govt. Officer Will be Preferred.<br>c) PG diploma or degree will be preferred. | 65 years. | 20 years<br>(Equivalent to rank of Dy. Director/DHO/ADHS/ Medical Superintendent/ Medical Officer Group 'A' (Grade pay Rs.5400/- as per 6th pay commission) at the time of retirement in case of Govt. officials.) | For Retired. Govt. officials salary as per General Administration Dept. GR dated 17.12.2016 |
| | | | | | In case of Non Govt. Sector, Candidate having MBBS registered with medical council is eligible.<br>For Non Govt. candidate age should be up to 38 years. | For Non Govt. candidate Gross salary Rs.70,000/- p.m. |

**सर्वसाधारण अटी व शर्ती:**

१) सदर विवक्षित कामांसाठी नियुक्ती कंत्राटी पध्दतीने सेवानिवृत्त शासकीय अधिका-यांसाठी एका वर्षासाठी व अशासकीय उमेदवारांसाठी ११ महिन्यासाठी राहील. करार कालावधीत सेवा समाधानकारक असल्यास पुढील कराराचे नुतनीकरण करण्यात येईल.

२) नियुक्तीसाठी पात्र उमेदवार शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवाराने त्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र रुजू होतेवेळी सादर करणे आवश्यक राहील.

३) शासन सेवेतून निवृत्त उमेदवाराविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसणे किंवा अशा चौकशी प्रकरणी शिक्षा झालेली नसणे आवश्यक आहे.

४) निवड होणाऱ्या शासकीय सेवानिवृत्त उमेदवारास सामान्य प्रशासन विभागाकडील दि.१७ डिसेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार मासिक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील. तसेच मुख्य वैद्यकीय सल्लागार पदाकरिता बिगर शासकीय उमेदवारास प्रति महिना रु.८०,०००/- (Gross रु. ऐंशी हजार फक्त) इतके मासिक वेतन व वैद्यकीय सल्लागार पदाकरिता बिगर शासकीय उमेदवारास प्रति महिना रु.७०,०००/-(Gross रु. सत्तर हजार फक्त) इतके मासिक वेतन अनुज्ञेय राहील.

५) नियुक्तीचे ठिकाण वरळी, मुंबई येथे राहील.

६) प्राप्त होणाऱ्या अर्जांची छाननी करुन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी पाचारण करण्यात येईल.

७) उपरोक्त पदसंख्येत आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.

८) अर्जदार हा मुंबई किंवा मुंबई लगतच्या परिसरातील रहिवासी असावा.

इच्छुक उमेदवारांनी ao02@jeevandayee.gov.in या ईमेलवर आपल्या बायोडेटासह अर्ज सादर करावा. तसेच वैयक्तिक /पोस्टाने अर्ज पाठवावयाचा असल्यास राज्य आरोग्य हमी सोसायटी,"जीवनदायी भवन", राज्य कामगार विमा योजना रुग्णालय आवार, गणपत जाधव मार्ग, वरळी नाका, वरळी मुंबई ४०० ०१८ या पत्यावर अर्ज सादर करावा. अर्ज सादर करण्याची अंतिम दि.०२/०८/२०२३ रोजी सांयकाळी ६:०० वाजेपर्यंत राहील.

उपरोक्त जाहिरातीनुसार प्राप्त अर्ज नाकारण्याचा अथवा जाहिरात रद्द करण्याचा हक्क मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्याकडे राखीव ठेवण्यात आला आहे.

सही
(विनोद बोंदरे)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
राज्य आरोग्य हमी सोसायटी

दि. १९.०७.२०२३
ठिकाण: वरळी, मुंबई-१८